

MAHAMUL03014/13/1/2012-TC
Special Issue No.2, March 2018

ISSN : Online : 2320-8341
Print : 2320-6446

# RESEARCH FRONT

An International Multidisciplinary Research Journal





Rayat Shikshan Sanstha's

**Shri. Raosaheb Ramrao Patil**
**Mahavidyalaya, Savlaj**
Tal. - Tasgaon, Dist - Sangli (Maharashtra)



Sponsored By

ICHR

**Indian Council of Historical Research (ICHR), New Delhi.**

20th & 21st March 2018

# Historical Perspective of Relevance and Impact of Dr. Ambedkar's Thought in the Contemporary Age

**Prin. Dr. Rajendra More**
Chief Editor

**Dr. Santosh Babare**
Executive Editor

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341



| | | |
|---|---|---|
| 24 | सामाजिक लोकशाहिचे प्रवर्तकः राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर **प्रा. सचिन शंकर ओवाळ** | **88-92** |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल **प्रा. डॉ. रविराज नामदेव कांबळे** | **93-97** |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दलित कवितेवरील प्रभाव **निलम पाटील** | **98-102** |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार हिताचे कार्य **प्रा. रोहिणी नवनाथ शिंदे** | **103-105** |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार **डॉ. संगीता संपत पाटील** | **106-110** |
| 29 | कृषीतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर **डॉ. वरेकर निवासराव अधिकराव** | **111-114** |
| 30 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार व सद्यपरिस्थिती **विद्या जालिंदर कांबळे** | **115-118** |
| 31 | दामोदर धर्मानंद कोसंबीः भारतीय इतिहासलेखनाचा एक उर्ध्वयु **श्री. किरण सर्जेराव पवार** | **119-121** |
| 32 | डॉ. बी.आर. आंबेडकर आणि हिंदू -कोड बिल **प्रा. सुरेश वसंत शिखरे** | **122-125** |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सबलीकरणातील योगदानः विशेष संदर्भ-हिंदू कोड बिल **डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर** | **126-130** |
| 34 | राधाबाई बळवंतराव वराळे यांचे आंबेडकरी चळवळीतील कार्य **डॉ. संघमित्रा वि. सरवदे-पाचपिंडे** | **131-133** |
| 35 | आंबेडकरांच्या कार्याचा थोडक्यात आढावा **सौ. धनश्री विश्वास पाटील** | **134-136** |
| 36 | भटक्या जमाती व बाबासाहेब आंबेडकर **जगन्नाथ बाबासो सावंत** | **137-143** |
| 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद आणि बुध्दिझमः एक दृष्टीक्षेप **प्रा. साळुंखे उमेश अशोक** | **144-146** |
| 38 | Historical Perspective : Impact of Ambedkar's Thoughts in the Contemporary Age **Shinde Santosh Laxman** | **147-151** |
| 39 | Dr. Babasaheb Ambedkar's Economic and Finance Role in India **Prin. Dr. Rajendra More, Dr. Santosh Babare** | **152-154** |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्माविषयक विचार **उमेश कमलाकर नवल** | **155-157** |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्पृश्यता नस्ट करण्याविषयीची भुमिका **श्रीकांत खंडू मुके** | **158-161** |



The accountability of the research matter articulated in this journal is entirely of the author(s) concerned. The view expressed in the research papers/articles in this journal does not essentially correspond to the views of the publisher/editor. The publisher/editor of the journal is not liable for errors or any consequences arising from the exercise of information contained in it.

RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# राधाबाई बळवंतराव वराळे यांचे आंबेडकरी चळवळीतील कार्य

**डॉ. संघमित्रा वि. सरवदे-पाचपिंडे**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, मा. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर
ईमेल:sanghmitra99@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य सर्वव्यापी आहे. हजारो वर्षे वर्णव्यवस्थेचा बळी ठरलेल्या समाजाला त्यांनी माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला. त्याच्या या लढ्यात त्यांच्या विचारांचे समर्थन करणारे व विरोध करणारेही लोक होते. त्यांच्या या लढ्यात त्यांना तन, मन आणि धनाने साथ देणारा त्यांचा समाज त्यांच्या मागे भक्कमपणाने उभा राहीला. त्यामुळे त्यांच्या चळवळीला खूप मोठी व्यापकता प्राप्त झाली. त्याचे कारण म्हणजे या समाजातून त्यांच्या चळवळीला कृतीशील पाठिंबा देणारी अनेक कुटुंबे उभी राहीली. कुटुंबातील प्रत्येक सदस्य काही ना काही योगदान या चळवळीसाठी देऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नविन विचार या कुटुंबांमध्ये रुजू लागला. याचा प्रभाव कुटुंबांतील स्त्रियांवर देखील झाला. या स्त्रियांनी त्यांच्या पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडून चळवळीला योगदान दिले. एवढेच नाही तर ज्या कुटुंबांमध्ये डॉ. आंबेडकरांचा विचार रुजला त्या कुटुंबांमधील पुरुषांनी आपल्या घरातील स्त्रीने पारंपारिक भूमिकेशी फारकत घ्यावी यासाठी खास प्रयत्न केले. त्यामुळे आंबेडकरी चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वाला बहर आलेला दिसून येतो.

बळवंतराव वराळे यांचा बाबासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक चळवळींमध्ये नेहमी सक्रिय सहभाग होता. ते बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे मुंबई विधानसभेतील आमदार होते. दि. 14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांच्या उपस्थितीत बौद्ध धम्म स्वीकारला. या समारंभाच्या आयोजनामध्ये वराळे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यांची पत्नी राधाबाई यादेखील त्यांच्या बरोबरीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये सहभागी झाल्या होत्या. तसेच, त्यांची मुलेदेखील राधाबाईंसमवेत सहभागी होत्या. नागपूर मुक्कामी झालेल्या बौद्ध धम्मदीक्षा समारंभाच्या प्रसंगी त्यांची मुलगी इंदुमती हिने या कार्यक्रमाचे स्वागतगीत म्हटले होते. थोडक्यात, बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व चळवळींशी वराळे कुटुंबीय संबंधित होते.[1]

**उद्देश्य :**

आंबेडकरी चळवळीतील राधाबाई बळवंतराव वराळे याच्या कार्याचा अभ्यास करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सोबत कार्य करणारे त्याचे समकालीन त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक कुटुंबे त्यांच्या चळवळीत ओढली गेली. अशा कुटुंबांपैकी निपाणीचे वराळे हे एक कुटुंब होय ! बळवंतराव वराळे हे डॉ. आंबेडकरांचे अत्यंत निकटचे सहकारी होते. वराळे व डॉ. आंबेडकर यांचे कौटुंबिक संबंध होते. डॉ. आंबेडकरांची चळवळ मोठी होण्यामागे जेवढा चळवळीतील पुरुषांचा तेवढीच कुटुंबातील स्त्रियांची देखील मेहनत कारणीभूत आहे. या स्त्रियांनी आपल्या घरातील पुरुषांना सहकार्य केले. प्रसंगी त्या या चळवळीत प्रत्यक्ष उतरल्या देखिल ! कुटुंबातील प्रत्येक सदस्य या चळवळीत सामील झालेला होता. त्यामध्ये अनेक स्त्रिया प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे चळवळीत कार्य करू लागलेल्या होत्या.

**राधाबाई वराळे यांचे संक्षिप्त चरित्र व कार्य :**

राधाबाईंचा जन्म इ.स. 1914 च्या आसपास झाला. त्यांचे वडील कृष्णाजी मुरारजी कांवळे शेती करत असत. आई गिरजाबाई तंबाखू व्यापारासाठी येणाऱ्या आपल्या महार लोकांसाठी घरात खानावळ चालवायच्या. राधाबाई एकुलत्या एक असल्याने त्यांचा घरात खूप लाड व्हायचा. हौस म्हणून त्यांच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

वडिलांनी त्यांना शाळेत घातले होते. वडिलांची आई बसव्वा त्यांच्या सोबतीला शाळेत जात होती. शाळा सुटेपर्यंत त्या शाळेच्या दारात बसून राहत. राधाबाई 4 थी उत्तीर्ण झाल्यावर 5 वी साठी मराठी मुलींच्या शाळेत जाऊ लागल्या. या शाळेत मागासवर्गीयांपैकी कोणी मास्तर नव्हते. या शाळेतील मास्तर त्यांना वेगळे बसवायचे व त्यांच्याशी दुजाभाव करायचे. त्यामुळे राधाबाईंनी शिक्षण सोडले.[२]

राधाबाईंचे लग्न पूर्वीच्या रूढी-परंपरेनुसार तेराव्या वर्षी बळवंतराव वराळे यांच्याशी झाले. राधाबाईंचे मामा कोंडिबानाना हे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांच्यामुळे त्यांना बाबासाहेबांच्या चळवळीची ओळख झाली होती. पती बळवंतराव यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी चांगला परिचय असल्याचे त्यांना समजले. त्या शाळेत असताना बाबासाहेब निपाणीस आले होते. मल्लिकार्जुन थिएटरमध्ये ती सभा झाली होती. या वेळी त्या मुली मुली मिळून बाबासाहेबांना पाहायला सभेला गेल्या होत्या.

लग्नानंतर त्या काही दिवस बेनाडी या त्यांच्या सासरी व नंतर काही दिवस निपाणी येथे वास्तव्यास होत्या. तद्नंतर हे दांपत्य इ.स. 1929 मध्ये धारवाडला आले. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह सुरू केले होते. त्याची जबाबदारी बळवंतराव वराळे यांच्यावर टाकली होती.

राधाबाई धारवाडला असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर धारवाड येथे दोन वेळा येऊन गेले होते. इ.स. 1929 साली स्टार्ट कमिटीच्या मीटिंगसाठी ते धारवाड येथे आले होते. बाबासाहेब डाकबंगल्यावर आठ दिवस होते. या वेळी त्यांना दररोज डबा पुरवण्याचे काम राधाबाई यांनी केले. त्यांनी आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. त्यात त्या म्हणतात, "बोर्डिंगवरही जेवणासाठी बाबासाहेब आले होते. त्यांना मेथीची भाजी आणि जोंधळ्याची भाकरी आवडायची. बाबासाहेबांना धारवाडचे वातावरण खूप आवडले होते. त्या काळात रमाई यांना येथील हवामान आवडेल असे त्यांना वाटले. माता रमाईंना टी.वी.चा आजार जडल्यामुळे त्यांना हवापालटसाठी वराळे यांच्या घरीच ठेवले होते. त्या तीन वेळा धारवाड येथे येऊन राहिल्या. त्यामुळे वराळे कुटुंबीयांस माता रमाईंचा जवळून सहवास लाभला. रमाईंनी राधाबाईंना आपल्या मुलीसमान आपल्या जीवनातील महत्त्वाच्या घटना सांगितल्या. या घटना राधाबाईंनी 'मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या सहवासात' पुस्तकातून चित्रित केल्या आहेत. माता रमाबाईंच्या स्वभावाच्या अनेक पैलूंची ओळख या पुस्तकातून होते.[३]

**पुणे करार सत्याग्रहात लहान मुलीसह सहभाग :**

गांधीजींच्या अनुयायांनी पुणे करार पाळला नाही म्हणून तो करार रद्द करावा, अशी मागणी बाबासाहेबांनी व त्यांच्या अनुयायांनी केली आणि त्यासाठी पुण्याला मोठा सत्याग्रह केला. या सत्याग्रहात राधाबाईंनी भाग घेतला होता व त्यामध्ये त्यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली होती.[४]

पुणे कराराविरोधी सत्याग्रहींना पकडून न्यायालयात नेण्यात आले. त्या वेळी राधाबाई लहान मुलांसह तुरुंगात आहेत, हे पाहून न्यायाधीश म्हणाले, "बाई, तुमचे हे मूल फार लहान आहे. तुम्हां सर्वांना तुरुंगात त्रास होईल, तरी गुन्हा कबूल करून माफी मागून घरी जा." पण त्यावर राधाबाई म्हणाल्या, "ज्या दिवशी आम्ही घरे सोडली त्या दिवशी विचार करूनच घर सोडले आहे. तरी आता माघार घेणार नाही. मी गुन्हा केला आहे, मला काय ती शिक्षा द्या."[५]

**वाङ्मयीन कार्य :**

बळवंतराव वराळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निपाणी येथील सहकारी होते. डॉ. आंबेडकर व त्यांचे सहकारी वराळे यांचे कौटुंबिक संबंध होते. राधाबाई व बळवंतराव या पतिपत्नीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्या संबंधातील दुर्मीळ आठवणी लिहून काढल्या व प्रकाशित केल्या. बळवंतराव वराळे त्यांनी 'परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात' हे पुस्तक लिहिले. त्यांच्या या पुस्तकातून बाबासाहेबांची व्यक्ती म्हणून ओळख होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात त्यांच्या प्रथम पत्नी रमाबाई आंबेडकरांचे स्थान अन्यन्यसाधारण आहे. वराळे पती-पत्नीस रमाबाईंची सेवा

करण्याचे भाग्य लाभले होते. तेव्हा राधाबाईंनी मातोश्री रमाबाईंच्या आठवणी 'मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या सहवासात' या पुस्तकातून कथन केल्या आहेत. त्याच्या या लिखानामुळे डॉ. आंबेडकर व रमाबाई यांच्या संबंधातील कौटुंबिक माहीती उपलब्ध झाली आहे. [६]

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रियांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या चळवळीत काम करताना त्यांना मातृत्त्वाची देखील अडचण झाली नाही. या स्त्रिया स्वतः बदलल्या तसेच त्यांनी संपूर्ण कुटुंब व समाजाची घडण बदलवली. अशा कुटुंबांमधून स्त्री-पुरुष समानतेचा विचार कृतीशीलतेतून रुजला. आंबेडकरी चळवळीतील पुरुषांनी देखील स्त्रियांना पारंपारिक चूल आणि मूल या संकल्पनेतून बाहेर काढून आंबेडकरी चळवळीत काम करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली. तसेच, अनेक स्त्रियांनी त्याचे सोने केले. काही स्त्रियांनी आपले गृहकर्तव्य सांभाळून त्यांच्या परीने कौटुंबिक व सामाजिक बदलासाठी योगदान दिले. या चळवळीमुळे लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. राधाबाई वराळे यांना बाबासाहेब आंबेडकारांच्या कौटुंबिक सहवास लाभला. त्यांच्या या अनुभव विश्वाचे वर्णन त्यांनी लिखीत स्वरुपात करून ठेवल्यामुळे माता रमाईच्या अप्रकाशित व्यक्तीमत्त्वाचे पैलू पुढील पिढीसाठी उपलब्ध झाले.

**संदर्भ :**

१) सरवदे संघमित्रा, आंबेडकरी चळवळीत महिलांचा सहभाग, विशेष संदर्भ कोल्हापूर, सांगली व सातारा अप्रकाशित पी.एचडी. शोध प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, 2012, पुणे, पृ. 181.
२) श्रीकांत वराळे (राधाबाई वराळे यांचा मुलगा) यांची मुलाखत दि. 4/05/2012.
३) कित्ता.
४) वराळे राधाबाई बळवंत, मातोश्री रमाबाई आंवेडकर यांच्या सहवासात, प्रबुध्द प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1999, पृ. 8.
५) पवार उर्मिला व मून मिनाक्षी, आम्हीही इतिहास घडवला, सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, 2000, पृ. 83.
६) सरवदे संघमित्रा, आंबेडकरी चळवळीत महिलांचा सहभाग, विशेष संदर्भ कोल्हापूर, सांगली व सातारा अप्रकाशित पी.एचडी. शोध प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, 2012, पुणे, पृ. 18०.